# महानगरपालिका औरंगाबाद

## सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक १२ फेब्रुवारी २००४**

**रजिष्टर क्र.**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक १२.०२.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

गुरुवार दिनांक १२.०२.२००४ रोजी मा.उपमहापौर सौ.साधना सुरडकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह" येथे दुपारी १२.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी तसेच खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री. भाऊसाहेब पुंडलिक ताठे
२. स.स.श्री. राधाकृष्ण गायकवाड
३. स.स.श्री. पांडुरंग यशवंतराव तायडे
४. स.स.श्री. वाणी ठकुजी रामसिंग
५. स.स.श्री. तांबे गणेश रामचंद्र
६. स.स.सौ. साजेदा बेगम विखार अहेमद
७. स.स.श्री. शेख इलियास किरमाणी शेख उमर
८. स.स.श्री. औताडे रावसाहेब ममतु
९. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडुजी
१०. स.स.श्री. रगडे भगवान दगडुजी
११. स.स.श्री. राजु रामराव शिंदे
१२. स.स.श्री. कावडे साहेबराव राणुबा
१३. स.स.श्री. वाघ भाऊसाहेब बाबुराव
१४. स.स.सौ. पवार मंदाबाई प्रभाकर
१५. स.स.सौ. घायतिलक लिलावती बाळासाहेब
१६. स.स.श्री. जगताप मोतीलाल रघुनाथ
१७. स.स.सौ. शिंदे रुख्मिनी राधाकिसन
१८. स.स.सौ. किवळेकर जयश्री सारंग
१९. स.स.सौ. कचराबाई उत्तमराव लोखंडे
२०. स.स.श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
२१. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तम बिनवडे
२२. स.स.श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानु
२३. स.स.श्री. अविनाश लक्ष्मण कुमावत
२४. स.स.सौ. विजया किशोर रहाटकर
२५. स.स.श्री. सावंत मधुकर दामोधर
२६. स.स.ॲड. सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२७. स.स.श्री. साळवे माणिक लक्ष्मण
२८. स.स.श्री. प्रकाश भाऊराव निकाळजे
२९. स.स.श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन
३०. स.स.श्री. शेख खाजा शेख सरफोद्दीन
३१. स.स.श्री. जैन विकास रतनलाल
३२. स.स.सौ. कांबळे निर्मला विठ्ठल

३३. स.स.श्री. संजय पांडुरंग शिरसाट
३४. स.स.श्री. डॉ.भागवत किसनराव कराड
३५. स.स.श्री. आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३६. स.स.सौ. रशिदा बेगम गफ्फार यार खॉन
३७. स.स.श्री. सुनिल यादवराव मगरे
३८. स.स.श्री. शिंदे किशोर रावसाहेब
३९. स.स.श्री. अ.कादर अ.हफीज
४०. स.स.श्री. पंडागळे रतनकुमार नारायण
४१. स.स.श्री. नासेर खान सरदार खान
४२. स.स.श्री. मो.जावेद मो.इसहाक
४३. स.स.श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४४. स.स.सौ. खरात कुसूमबाई दौलत
४५. स.स.सौ. नुसरत बानो फिरोज खान
४६. स.स.सौ. मोरे जयश्री कुमारराव
४७. स.स.श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
४८. स.स.श्री. फुलारी नंदकुमार माधवराव
४९. स.स.सौ. कुलकर्णी जयश्री विजय
५०. स.स.श्री. पारे सोपान भाऊराव
५१. स.स.सौ. विमलबाई भिकनसिंग राजपुत
५२. स.स.श्री. देसरडा प्रशांत सुभाष
५३. स.स.सौ. ताराबाई सुधाकर जेजूरकर
५४. स.स.श्री. अशरफ मोतीवाला
५५. स.स.सौ. संगिता बाळु मैंद
५६. स.स.श्री. होलिए रणधीर अशोकसिंग
५७. स.स.श्री. नासीर खान अ.रहेमान खान कुरैशी
५८. स.स.सौ. शाहीन जफर महमूद जफर
५९. स.स.श्री. चंद्रशेखर जैस्वाल
६०. स.स.सौ. दाणे चंद्रभागाबाई भगीरथ
६१. स.स.श्री. ओक जयवंत केशवराव
६२. स.स.श्री. सय्यद सलीम स.युसूफ
६३. स.स.श्री. तकीहसन खान कासीम हसनखान
६४. स.स.श्री. गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६५. स.स.श्री. मीर हिदायत अली मीर बसालत अली
६६. स.स.सौ. सिद्दीकी नईम सुलताना
६७. स.स.श्री. अजीज खान गणी खान
६८. स.स.श्री. अफसर खान यासीन खान
६९. स.स.सौ. सुलताना बेगम चाँद खा
७०. स.स.श्री. लकडे भरत श्रीपती
७१. स.स.श्री. शेख मुनाफ शेख यासीन
७२. स.स.श्री. सलीम पटेल समशेर पटेल
७३. स.स.श्री. कैसर खान बद्रोद्दीन खान
७४. स.स.श्री. तुळशीबागवाले किशोर बाबुलाल

७५. स.स.श्री. जगदिश कन्हैय्यलाल सिध्द
७६. स.स.सौ. बबीता सुभाष कागडा
७७. स.स.श्री. स.अली सलामी स.मीरा सलामी
७८. स.स.श्री. तनवाणी किशनचंद लेखराज
७९. स.स.सौ. निखत परवीन ऐजाज अली

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

१. स.स.श्री. सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
२. स.स.श्री. भगवान देविदास घडमोडे
३. स.स.श्री. सुरजितसिंग खुंगर
४. स.स.श्री. तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग धिल्लन
५. स.स.सौ. सलमा बानो मीर महंमद अली

**विषय क्र.२९५/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये औरंगाबाद महानगरपालिकेच्या महापौर पदावर निवड करणे.

महानगरपालिका (महापौर पदांचे आरक्षण) नियम १९९४ नुसार महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, १६ ऑक्टोंबर २००० चे पान क्र.६१ वर, शासन नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई कडील अधिसूचना क्र.१०२०००/१९२५/सी.आर./१०६/२०००, नवि-२४ अन्वये महापौर पद हे महिलांसाठी आरक्षित करण्यांत आलेले आहे.

**संवाद :**

**मा.पिठासीन अधिकारी :** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ (५) अन्वये महापौर पदासाठी निवड करण्याकरिता दिनांक ०३ फेब्रुवारी, २००४ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४, ४५ व ४७ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ०८ फेब्रुवारी, २००४ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ०८ फेब्रुवारी २००४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत महापौर पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

| | |
|---|---|
| १. | श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| २. | श्रीमती निखत परवीन एजाज अली |
| ३. | श्रीमती सिद्दीकी नईम सुलताना म.फसोयोद्दीन |

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४४ व ४७ अन्वये आता प्राप्त नामनिर्देशपत्राची छाननी करण्यांत येत आहे.

(पिठासीन अधिकारी नगरसचिव यांचे मदतीने छाननी करतात.)

**मा.पिठासीन अधिकारी :** छाननीचे काम पूर्ण झाले असून खालील नामनिर्देशपत्रे वैध ठरलेली आहेत.

| | |
|---|---|
| १. | श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| २. | श्रीमती निखत परवीन एजाज अली |
| ३. | श्रीमती सिद्दीकी नईम सुलताना म.फसोयोद्दीन |

वरीलपैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमत्तीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.
सभेत सुचक किंवा अनुमोदक यापैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोघोपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे. त्याच सम्मतीने ३० मिनीटाच्या अवधित म्हणजेच १२.५० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना महापौर पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव १२.५० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर महापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**श्री.स.अली सलामी :** स.स.श्री. विकास जैन यांच्या बाबत उच्च न्यायालयात प्रकरण चालु आहे, तसेच स.स.श्री. राधाकृष्ण गायकवाड, सभागृह नेते यांचे सुध्दा जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भात न्यायालयात प्रकरण आहे, यांना मतदानासाठी हक्क प्राप्त होतो का? माहिती देण्यांत यावी.

**मा.पिठासीन अधिकारी :** मतदानास सुरुवात होण्यापुर्वी यासंबंधी माहिती देण्यांत येईल.
महापौर पदासाठी ०३ उमेदवारांपैकी विहीत मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेण्याऱ्यांची नांवे |
|---|---|
| १ | श्रीमती सिद्दीकी नईम सुलताना म.फसोयोद्दीन |

महापौर पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी परत घेण्याऱ्यांची नांवे |
|---|---|
| १ | श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन |
| २ | श्रीमती निखत परवीन एजाज अली |

मतदानाबाबत गोपनियता पाळता यावी म्हणुन मतपत्रीकेच्या स्थळ प्रतीवर अनुक्रमांक राहील मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही. त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.
मतपत्रीका १ तासात तयार होतील व मतदानाला सुमारे १.५५ वाजता सुरुवात होईल तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी/अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करुन घ्यावी व त्यानंतरच

नगरसचिव यांनी सर्व स.सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मतपत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

**नगरसचिव :** नमुना मतपत्रिका फलकावर लावण्यात आलेली आहे.

**मा.पिठासीन अधिकारी :** मतपेटीजवळ नियुक्त केलेल्या मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवुन द्यावे व मतपेटीला कुलूप लावून तिची चावी माझेकडे आणुन द्यावी व मतपेटी मोहोरबंद करुन घ्यावी.

(पिठासीन अधिकारी स्वतः च्या सहीने मतपेटी मोहोरबंद करुन घेतात.)

**मा.पिठासीन अधिकारी :** सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वत: उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरिता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठवता येईल. त्यासाठी मतदान सुरु होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरुपात देणे आवश्यक आहे तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी व्यतिरिक्त इतर स.सभासदांनी कृपया गर्दी करु नये.

नगरसचिव यांनी कृपया मतदाना संबंधीच्या सुचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

**नगरसचिव :** मतदाना संबंधीच्या सुचना खालीलप्रमाणे आहेत.

०१. मतदानास प्रत्यक्ष सुरुवात करतांना प्रभागनिहाय स.सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील

०२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यांत आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

०३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा.पिठासीन अधिकीर यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

०४. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक - ५० कोणत्याही सभासदाला एका पेक्षा जास्त इच्छुकांना आपले मत देता येणार नाही. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतदान पत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्याच्या नांवासमोर फुली करील. ( X )

०५. सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र.४५ (जे) मधील तरतूदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१) जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर खुण केलेली असेल अथवा

२) जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल अथवा

३) जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरउपयोगी आहे.

**मा.पिठासीन अधिकारी :** नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यांत आलेली आहे. आता मतदानाला सुरुवात होत आहे. प्रभागनिहाय स.सभासदांची नांवे पुकारण्यांत येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (एफ) च्या अनुषंगाने

मतदानासाठी १ तासाचा कालावधी देण्यांत येत असून सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता ०२.०० वाजले असून मतदान ०३.०० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर महापौर पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स.सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यास सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/नस/२००४/७१, दि.०३.०२.२००४ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यांत येत असून सदर आदेशाद्वारे ज्यांना-ज्यांना जी कामे नेमून देण्यांत आलेली आहेत. त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत. जनसंपर्क अधिकारी यांनी नांवे पुकारण्यास सुरुवात करावी.

**जनसंपर्क अधिकारी :** नांवे पुकारल्यानुसार - वार्ड क्र.१,२ च्या स.सदस्यांनी मतदान केले, त्यानंतर वार्ड क्र.८२ चे स.सदस्य यांनी त्यांचे लेखी मागणी केल्यानुसार व मा.महापौर यांनी सम्मती दिल्यानुसार मतदान केले. यानंतर वार्ड क्र.३,४,५,६,७,८,९,१० चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला. यानंतर वार्ड क्र.४६ चे स.सदस्य यांनी त्यांना कामानिमित्त जायचे असल्याने त्यांचे लेखी मागणीस मान्यता दिल्यानुसार त्यांनी अगोदर मतदान केले. यानंतर वार्ड क्र.११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८,१९,२० चे स.सदस्यांनी मतदान केले. वार्ड क्र.२२ चे स.सदस्य यांना मतपत्रिका दिल्यानंतर मतपत्रिका खराब झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी दुसरी मतपत्रिका देण्याचे आदेशित केल्यानुसार त्यांनी मतदानात भाग घेतला व खराब मतपत्रिका मोहोरबंद करण्यात आली. यानंतर वार्ड क्र.२३,२४,२६,२७,२८, ३०,३१,३२,३३ च्या स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र.२१ चे स.सदस्या मा.पिठासीन अधिकारी म्हणुन बसलेल्या सौ.साधना सुरडकर यांचे मतदानासाठी नांव पुकारले असता त्यांनी त्यांचे जागेवर पिठासीन अधिकारी म्हणून स.स.श्रीमती घायतिलक लिलावती यांचे नांव पुकारल्या नुसार त्या पिठासीन अधिकारी पदाचे आसन ग्रहण करतात. त्यानंतर स.स.सौ. सुरडकर यांनी मतदान केले. यानंतर वार्ड क्र.३४,३५,३६,३७,३८,३९,४०,४२,४३,४४,४५,४७ चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला. यानंतर वार्ड क्र.४८,४९,५०,५१ चे स.सदस्यांनी मतदान केले. (याचवेळी उपमहापौर तथा पिठासीन अधिकारी सौ.साधना सुरडकर पुन्हा त्यांचे पिठासीन पदाचे आसनग्रहण करतात.)

**श्री.अफसर खान :** पत्रकार कक्षात बाहेरील लोक येवुन बसलेले आहेत. त्या नागरिकांना बसण्याची परवानगी दिलेली आहे का? खुलासा द्यावा. लेखी स्वरुपात दाखवावे.

**मा.पिठासीन अधिकारी :** फक्त १० लोकांना गॅलरीत बसण्याची परवानगी देण्यांत आलेली आहे. त्या व्यतिरिक्त कोणी असेल तर त्यांनी कृपया बाहेर जावे.

**जनसंपर्क अधिकारी :** नावे पुकारल्यानुसार यानंतर वार्ड क्र.५२,५३,५४,५६,५७,५८, ५९,६०,६१,६२,६३,६४,६५,६६,६७,६८,६९,७०,७१,७२,७३,७४,७५ चे सदस्यांनी मतदान केले तसेच वार्ड क्र.४१ चे स.सदस्य यांनीही मतदान केले. यानंतर वार्ड क्र.७७,७८,७९ चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला. वार्ड क्र.८० चे स.सदस्य यांचे नांव पुकारल्यानंतर त्यांनी मदतनीस साठी लेखी मागणी

केल्यानुसार मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार डॉ.जयश्री कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना मदत केली. यानंतर वार्ड क्र.८१,८३ चे स.सदस्यांनी मतदान केले.

**मा.पिठासीन अधिकारी :** ज्या स.सदस्यांनी मतदान केले नाही अशांची पुन्हा नांवे पुकारावीत.

(जनसंपर्क अधिकारी वार्ड क्र.५५ चे सदस्यांचे नांव पुकारतात.)

**मा.पिठासीन अधिकारी :** आता ०३.०० वाजले असून मतदान संपले आहे असे मी घोषित करते. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांनी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स.सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी कृपया गर्दी करु नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यास सहकार्य करावे, ही विनंती. (यावेळी मतमोजणी करण्यात येते.)

**मा.पिठासीन अधिकारी :** मतमोजणीचे काम पूर्ण झाले.

एकूण मतदान - ७९
अवैध मते - ००
वैध मते - ७९

उमेदवारांना पडलेली मते खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| १ | श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन | ५६ |
| २ | श्रीमती निखत परवीन एजाज अली | २३ |

मतमोजणीच्या निकालावरुन मी असे घोषित करते की, महापौर पदासाठी श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन यांची बहुमताने निवड झाली असून मी त्यांचे अभिनंदन करते. त्यांनी महापौर पदाचे आसनग्रहन करावे. (याचवेळी नुतन महापौर आसनग्रहण करतात, नुतन महापौर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात येते तसेच प्रशासनातर्फे मा.आयुक्त, नगरसचिव यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यानंतर सभागृहात समयोचित भाषणे झाली.)

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार श्रीमती शिंदे रुख्मीनी राधाकिसन यांना सर्वाधिक मते पडल्याने त्यांची महापौर पदी बहुमताने निवड करण्यास मंजूरी देण्यांत आली.

याचबरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
महापौर
महानगरपालिका, औरंगाबाद.